# मिरा भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

### मा. स्थायी समिती सभा दि. २२/ ०६ /2020.

### //गोषवारा//

**प्रकरण क्र.:-** ९४ मिरा रोड (पुर्व) मिरा एम.आय.डी.सी. येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल / दुरुस्ती करणे कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मंजुरी मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) येथील मिरा एम.आय.डी.सी. येथे हाय लेव्हल व लो लेव्हल जलकुंभ अस्तित्वात आहे. सदर जलकुंभावरुन शांतीगार्डन, प्लेझंटपार्क, मुन्शी कंम्पाऊंड, मिरागाव, पेणकरपाडा व महाजनवाडी इत्यादि परिसरात पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर जलकुंभामध्ये पाणी चढविण्याकरीता पंपिंग स्टेशन बांधण्यात आलेले आहे. सदरची पंपिंग स्टेशन योग्य रितीने चालू राहून उपरोक्त परिसरात पाणी पुरवठा सुरळीत राहणेकरीता पंपिंग स्टेशनची देखभाल दुरुस्ती प्रशिक्षित कर्मचाऱ्यामार्फत करुन घेणे गरजेचे असते. मिरा एम.आय.डी.सी. पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती कामाची निविदा काढणे आवश्यक आहे. अन्यथा त्याचा परिणाम पाणी पुरवठयावर होण्याची शक्यता असते.

सदर कामाकरीता रु.28,96,100/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता (पापु)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

**मा. स्थायी समिती सभा दि. २२/ ०६ /2020.**

**//गोषवारा//**

प्रकरण क्र.:-९५ भाईंदर (पुर्व) येथिल फाटक जलकुंभ येथुन मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे (खाजगी टँकरचा प्रतीफेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे) कामास निविदा मंजुरी मिळणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे कामास मा. महासभेने दि.31/01/2020, ठराव क्र.84 अन्वये आर्थिक व प्रशासकिय मान्यत दिलेली आहे.

सदर कामाची जाहिर निविदा सुचना क्र.30 दि.02/02/2020 रोजीच्या दै.नवभारत समाचार, ठाणे वैभव, प्रात:काल, संध्यानंद, दि फ्रि प्रेस जर्नल, लोकमत व दि इकोनॉमिक्स टाईम्स मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर कामाकरीता दि.28/02/2020 पर्यंत एकही निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या नसल्याने सदर निविदेला दि.28/02/2020 रोजी मुदतवाढ प्रसिद्धअंती दि.11/03/2020 पर्यंत तिन निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

सदर निविदेस दि.08/04/2020 रोजी मा. निविदा निवड समितीने तांत्रिक छानणी करुन आर्थिक देकार लिफाफा उघडण्यास मान्यता दिलेली आहे. सदर निविदेतील 1) मे. श्रृती इंटरप्रायजेस, 2) मे. डिसिल्वा ट्रान्सपोर्ट ॲण्ड वॉटर सप्लाय व 3) मे. सागर वॉटर सप्लार्य या पैकी मे. श्रृती इंटरप्रायजेस या निविदा धारकाने लघुत्तम दर रु.585/- प्रती फेराप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|
| 1. | मे. श्रृती इंटरप्रायजेस | रु.585/- प्रती फेरा |
| 2. | मे. डिसिल्वा ट्रान्सपोर्ट ॲण्ड वॉटर सप्लाय | रु.599/- प्रती फेरा |
| 3. | मे. सागर वॉटर सप्लार्य | रु.810/- प्रती फेरा |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. श्रृती इंटरप्रायजेस यांनी निविदेत सादर करण्यात आलेले दर हे मागिल वर्षाच्या तुलनेत कमी असल्याने प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत आहेत.

तरी **मे. श्रृती इंटरप्रायजेस** यांनी सादर केलेल्या रु.585/- प्रती फेरा या निविदेला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) नुसार मान्यता मिळणेस शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.22/6/2020.

## सार्व. आरोग्य विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण :- 96 मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP/ 15 HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व. आरोग्य विभागाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी दि.10/05/2020 रोजीच्या दै. सागर या वृत्तपत्रात व Tender Id No.2020_MBMC_575484_1 जाहिर फेर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेसाठी एक वेळा निविदा, दोन वेळा मुदतवाढ व फेर निविदा मागवून देखील 02 निविदा प्राप्त झाल्या आहेत.

पावसाळ्यापुर्वी सखल भागातील ठिकाणी सक्शन पंपचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाची निकड व अत्यावश्यक बाब म्हणून प्राप्त 02 निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स उघडण्यात आले होते. निविदाधारकांनी निविदा अटीशर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे विभागाने तपासली असून निविदा पात्र ठरले आहेत.

सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स यांचे दराचे लिफाफे (Financail Bid) उघडणेस मा. निविदा समितीने शिफारस केली असून मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) दि.03/06/2020 रोजी उघडण्यात आला होते. त्यानुसार सक्शन पंप पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स या निविदाकारांनी सादर केलेल्या दराची तुलना केली असता, मे. गणेश डेव्हलपर्स यांचे कमी आहेत. मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेल्या दरासंबंधी वाटाघाटी करणेसाठी दि. 04/06/2020 रोजी निविदा समिती समोर बोलविण्यात आले होते. मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदा समितीपुढे उपस्थित राहून खालील नमुद दरामध्ये काम करण्याची लेखी पत्र देऊन तयारी दर्शविली आहे. L1 निविदाधारक मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटघाटी अंती सादर केलेले दराबाबत बाजारभावाशी तुलना केली असता, तसेच MJP चे DSR चे दर तपासले असता निविदेतील दर वाजवी आहेत. निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Suction Pump | मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी निविदेत सादर केलेले दर | मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेले दर (L1 निविदाधारक) | मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी नंतर मान्य केलेले दर (L1 निविदाधारक) |
|---|---|---|---|---|
| 1 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 10 HP | RS. 590/- PER HRS. | RS.560/- PER HRS. | **RS. 498/- PER HRS.** |
| 2 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 15 HP | RS. 640/- PER HRS. | RS.610/- PER HRS. | **RS. 593/- PER HRS.** |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10 HP व 15 HP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(चंद्रकांत डांगे भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Sakshan pump 2020.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२२/०६/2020.

## सार्व. आरोग्य विभाग

## // पुरक गोषवारा //

प्रकरण :- ९६ **मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी भाड्याने 10HP/ 15 HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व. आरोग्य विभागाकरीता विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी दि.10/05/2020 रोजीच्या दै. सागर या वृत्तपत्रात व Tender Id No.2020_MBMC_575484_1 जाहिर फेर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेसाठी एक वेळा निविदा, दोन वेळा मुदतवाढ व फेर निविदा मागवून देखील 02 निविदा प्राप्त झाल्या आहेत.

पावसाळ्यापुर्वी सखल भागातील ठिकाणी सक्शन पंपचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे कामाची निकड व अत्यावश्यक बाब म्हणून प्राप्त 02 निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स उघडण्यात आले होते. निविदाधारकांनी निविदा अटीशर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रे विभागाने तपासली असून निविदा पात्र ठरले आहेत.

सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स यांचे दराचे लिफाफे (Financail Bid) उघडणेस मा. निविदा समितीने शिफारस केली असून मा.आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. सदर निविदेतील पात्र निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) दि.03/06/2020 रोजी उघडण्यात आला होते. त्यानुसार सक्शन पंप पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी व मे. गणेश डेव्हलपर्स या निविदाकारांनी सादर केलेल्या दराची तुलना केली असता, मे. गणेश डेव्हलपर्स यांचे कमी आहेत. मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेल्या दरासंबंधी वाटाघाटी करणेसाठी दि. 04/06/2020 रोजी निविदा समिती समोर बोलविण्यात आले होते. मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदा समितीपुढे उपस्थित राहून खालील नमुद दरामध्ये काम करण्याची लेखी पत्र देऊन तयारी दर्शविली आहे. L1 निविदाधारक मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी अंती सादर केलेले दराबाबत बाजारभावाशी तुलना केली असता, तसेच MJP चे DSR चे दर तपासले असता निविदेतील दर वाजवी आहेत. निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Suction Pump | मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी निविदेत सादर केलेले दर | मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेले दर (L1 निविदाधारक) | मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी नंतर मान्य केलेले दर (L1 निविदाधारक) |
|---|---|---|---|---|
| 1 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 10 HP | RS. 590/- PER HRS. | RS.560/- PER HRS. | **RS. 498/- PER HRS.** |
| 2 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL, OPERATIONAL AND MAITENANCE AND TRANSPORTATION ETC. - 15 HP | RS. 640/- PER HRS. | RS.610/- PER HRS. | **RS. 593/- PER HRS.** |

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10 HP व 15 HP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे. गणेश डेव्हलपर्स यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दरानुसार तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून निविदा दर स्विकारणेस तसेच सदर कामी अंदाजे रु. 70.00 लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामी मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**(डॉ.संभाजी पानपट्टे)**
**उपआयुक्त (आरोग्य)** 10/6
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Sakshan pump 2020.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा

दि२२/०६/२०२०

## // गोषवारा //

**विषय २४.- मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे व मोकाट मांजरावर निर्बिजीकरण व लसीकरण करणे, जखमी कुत्रे व मांजरांवर उपचार करणे तसेच पिसाळलेले कुत्रे व मांजरे यांचा बंदोबस्त् करणे कामाच्या निविदेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे व मोकाट मांजरावर निर्बिजीकरण व लसीकरण करणे,जखमी कुत्रे व मांजरांवर उपचार करणे तसेच पिसाळलेले कुत्रे व मांजरे यांचा बंदोबस्त् करणे कामी दोनवर्षाकरिता ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस 2 वेळा मुदतवाढ देउनही स्पर्धा न झाल्याने फेरनिविदा काढण्यात आली. दि.15/01/2020 रोजी "संध्याकाळी", "वृत्तमानस" व "महाराष्ट्र सम्राट" या वर्तमानपत्रात तसेच शासनाच्या संकेतस्थळावर या कामाची जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दोन निविदाधारकाने निविदेतील अटीशर्तीनुसार मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट ॲन्ड रिसर्च सेंटर व मे. नवोदय वेट सोसायटी या निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. विभागाने तांत्रिक लिफाफयामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी केली असता, मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट ॲन्ड रिसर्च सेंटर व मे. नवोदय वेट सोसायटी यांनी तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता केली असून ते पात्र ठरले.

दि. 02/03/2020 रोजी मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट ॲन्ड रिसर्च सेंटर व मे. नवोदय वेट सोसायटी यांचा दराचा लिफाफा उघडला असता खालीलप्रमाणे दर आहेत.

| क्र. | तपशील | मे. माय वेटस चॅरीटेबल ट्रस्ट | मे. नवोदय वेट सोसायटी |
|---|---|---|---|
| १. | Sterilization and Anti Rabbies Vaccination of un-sterilized stray Dogs Treatment of injured Dogs and attend all the complaints regarding stray Dogs within the MBMC | १०९० (प्रति श्वान) | १०१७ (प्रति श्वान) |
| २. | Sterilization and Anti Rabbies Vaccination of un-sterilized Cats, Treatment of injured Cats and attend all the complaints regarding Cats within the MBMC | १०९० (प्रति मांजर) | ७२७ (प्रति मांजर) |

वरीलप्रमाणे मे. नवोदय वेट सोसायटी यांचे दर कमी व वाजवी आहेत. तेव्हा सदरच्या कमी दराच्या निविदेस आर्थिक मंजूरीसह निविदा स्विकारण्यास शिफारस असे.

(मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने)

(डॉ.संभाजी पानपट्टे)
उप-आयुक्त (आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा

दि.२२/०६/२०२०

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. :- ९८ वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपुर्ण सेवा) भाडयाने घेण्याच्या वार्षिक निविदेस मुदतवाढ देणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने घेण्याची वार्षिक निविदा Online E- Tendering द्वारे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा मागविण्यात आलेली असुन निविदा प्रक्रिया पुढील कार्यवाही करीता प्रस्तावित आहे. तत्पुर्वी मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ५९ दि. २८/०८/२०१९ अन्वये सदर निविदेस सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली असून सदरची मुदत दि. २८/०२/२०२० रोजी संपलेली आहे. तथापी साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ च्या खंड २, ३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार कोरोना विषाणुमुळे उदभवलेल्या संसर्गजन्य रोगास कोव्हीड-१९ प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी अधिसुचना क्र. कोरोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य दि. १४ मार्च २०२० ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हीड -१९ आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक असल्याने कोव्हीड-१९ या आजाराबाबत नागरीकांमध्ये जनजागृती करणे तसेच कोरोना आजाराचा प्रादुर्भाव रोखणेसाठी ठेकेदारामार्फत ठेका वाहन, रिक्षा, रिक्षा ध्वनीक्षेपणासह तरोच अन्न पुरवठा करणेकामी टेम्पो इ. वाहने आवश्यकतेनुसार ठेकेदारामार्फत पुरवठा करण्यात येत आहेत. प्रस्तावित निविदा अंतिम होऊन मा. स्थायी समिती सभेची मंजुरी घेऊन नविन ठेकेदारास प्रत्यक्ष कार्यादेश देईपर्यंत मुतदवाढ देणे उचित वाटते. तरी अत्यावश्यक सेवा व महापालिकेच्या विविध विभागातील सेवा नियमित चालू ठेवण्यासाठी नविन ठेकेदारास प्रत्यक्ष कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस महानगरपालिका अत्यावश्यक सेवा म्हणुन महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार मुदतवाढ देणेस व येणा-या खर्चास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

तरी सदर कामी मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा

दि. २२/०६/२०२०

### ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. :-९९ मिरा भाईदर महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या निविदेस मुदतवाढ देणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विविध विभागात ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी एक वर्षाकरिता मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना दिलेल्या ठेक्याची मुदत दि. 31/12/2019 रोजी संपुष्टात आलेली आहे. सदर प्रकरणी नविन निविदा मागविणेकरिता आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेकरिता मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा. महासभेपुढे गोषवारा देण्यात आलेला असता महासभेने दि. 31/01/2020 ठराव क्र. 86 अन्वये महापालिकेच्या आस्थापनेवर ठेका पध्दतीने कर्मचारी उपलब्ध करणेकरिता एकत्रित निविदा मागविण्याचा ठराव मंजुर करण्यात आलेला आहे. त्यानुसार विभागामार्फत जा.क्र.मनपा/वाहन/238/2019-20 दि. 03/03/2020 अन्वये निविदेबाबत पुढील कार्यवाही करणेकरिता प्रस्ताव आस्थापना विभागाकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

आस्थापना विभागामार्फत निविदा प्रक्रिया प्रस्तावित आहे. सदर ठेका वाहनचालक निविदा मुदत दि. 31/12/2019 रोजी संपलेली असल्याने मा. आयुक्त सो. यांनी सदर निविदेस दि. 14/01/2020 रोजी नविन निविदा पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्यानुसार मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांच्या मार्फत महापालिकेच्या विविध विभाग (उदा. अग्निशमन विभाग, वैदयकिय आरोग्य विभाग, उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग, सामान्य प्रशासन विभाग (इ.) विभागात नियमित वाहनचालक पुरवठा करित आहेत. तरी सदरकामी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन ठेकेदारास प्रत्यक्ष कार्यादेश देईपर्यंत मुदतवाढ देणेस व येणा-या खर्चास मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**अतिरिक्त आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**